## आजचा शुभ विचार

“"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-44 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 18 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ४४ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. १८ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


# वारकऱ्यांना पथकरात सूट

## आषाढी एकादशीनिमित्त एसटीला पथकर माफी

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या दहा मानाच्या पालख्या आणि वारकरी, तसेच भाविकाच्या वाहनांना पथकरातून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आषाढी एकादशीनिमित्त १८ जून ते १० जुलै या कालावधीत पंढरपूरला जातना व परत येताना पालख्या, भाविक व वारकऱ्यांच्या हलक्या व जड वाहनांना पथकरात सूट देण्यात आली आहे. तसेच आषाढी एकादशीनिमित्त जादा वाहतूक करणाऱ्या एसटीला पथकर माफी देण्यात आली आहे. 'आषाढी एकादशी २०२५', गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करून आवश्यक त्या संख्येनुसार स्टीकर्स पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या, भाविक व वारकऱ्यांना देण्यात येणार आहेत. यासाठी परिवहन विभाग, वाहतूक पोलीस, संबंधित परिवहन विभाग यांच्याशी समन्वय साधून पोलीस ठाणे वाहतूक पोलीस चौक्या व परिवहन विभागामध्ये स्टीकर्स उपलब्ध करून देतील. तसेच हे स्टीकर्स / पास परतीच्या प्रवासासाठी ग्राह्य धरण्यात येतील. त्यामुळे परतीच्या प्रवासासाठी वेगळी नोंदणी किंवा




स्टिकर्स घ्यावे लागणार नाही. भाविक, वारकरी तसेच पालख्यांच्या वाहनांना संबंधित जिल्ह्यातील व शहरातील सर्व पोलीस ठाणे व वाहतूक विभागातून भाविकांच्या मागणीप्रमाणे पथकर माफीच्या पासचे वाटप करण्यात येणार आहे. तर, महाराष्ट्राच्या विविध भागांतून पंढरपूरच्या दिशेला जाणाऱ्या रस्त्यांवरील सर्वच पथकर नाक्यांवर एसटी बसगाडीला पथकरातून सूट देण्यात येणार आहे. सर्व पथकर नाक्यांवर स्वतंत्र पोलीस यंत्रणा तैनात असणार आहे. तसेच परिवहन विभागालाही जादा बस सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीकोनातून पथकर नाक्यांजवळ महामार्ग पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा परिषद आदींचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने तैनात करण्यात येणार आहेत. आपत्कालीन स्थितीचा सामना करण्यासाठी मुंबई – पुणे द्रुतगती मार्ग, तसेच राज्यातील इतर सर्व संबंधित रस्ते / महामार्गावर रुग्णवाहिका व क्रेनची व्यवस्था करण्यात येणार आहे. मुंबई – कोल्हापूर– बंगलोर, पुणे – सोलापूर राष्ट्रीय मार्गावर क्रेनची व्यवस्था करण्याचे निर्देश राज्य सरकारने संबंधित प्रशासनाला दिले आहेत. मुंबईमधील शीव – पनवेल महामार्ग, मुंबई – पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई – बंगलोर राष्ट्रीय महामार्ग, पुणे – सोलापूर, पुणे – सातारा – कोल्हापूर ते राज्य सीमेपर्यंतचा महामार्ग; तसेच मुंबई – पुणे – कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग व मुंबई – पुणे – सोलापूर राष्ट्रीय मार्गाला जोडणारे नवीन राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण रस्ते आदींवरील खड्डे बुजवणे, दुरुस्ती कामे, सूचना फलके लावण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे पंढरपूरला जाणारे वारकरी, भाविकांना प्रवासादरम्यान त्रास होणार नाही.

# कुंडमळा पूल दुरुस्तीला हेतुपुरस्सर दिरंगाई झाली असल्यास संबंधितांवर कारवाई होणार

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पादचारी पूल वाहून गेल्याची दुर्घटना अत्यंत दु:खद असून मृतांच्या कुटुंबासोबत व जखमी व्यक्तींसोबत महायुती सरकार खंबीरपणे उभे आहे. मात्र अशा दु:खद प्रसंगी संजय राऊत यांनी निव्वळ राजकारण करण्याच्या उद्देशाने केलेली टीका ही अत्यंत उथळ, अपरिपक्व विचारांचे प्रदर्शन करणारी आहे अशी घणाघाती टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मंगळवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये चव्हाण बोलत होते. पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला हेतुपुरस्सर दिरंगाई झाली असेल



तर संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित कारवाई होईल, अशी ग्वाहीही चव्हाण यांनी दिली. कुंडमळा नदीवरील जोडरस्त्यासह नवीन पूलाच्या बांधकामासाठी जुलै, राज्याच्या २०२४ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये ८ कोटी रुपयांच्या तरतुदीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर २०२४ विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाली. दरम्यानच्या काळात सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता व पूलाचे डिझाईन अंतिम करण्यात आले. मावळ तालुक्याचे भाजपाचे तालुकाध्यक्ष रविंद्र भेगडे यांनी पाठपुरावा केल्यानंतर शेतकरी व लोकहितासाठी आपण तात्काळ ८ कोटी रुपयांच्या रक्कमेच्या नवीन पूलास प्रशासकीय मंजूरी दिल्याचे पत्र ११ जुलै, २०२४ रोजी दिले होते. बांधकाम विभागातर्फे या पुलाच्या दुरुस्तीचा कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, एका वर्षात काम पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या गेल्या होत्या असे असताना पुढील प्रक्रियेला हेतुपूर्वक विलंब लावला गेला असेल तर त्याची चौकशी होईल आणि दोषींवर कारवाईही होईल, असे चव्हाण म्हणाले. अर्थसंकल्प कसा वाचायचा याची ढोबळ माहितीही राज्यसभा खासदार असलेल्या संजय राऊत यांना नसल्याचे त्यांनी केलेल्या टीकेवरून दिसत आहे . या पुलाच्या कामासंदर्भात राऊत यांनी केलेल्या आरोपांची कीव येते. अर्थसंकल्पात आकडे हजारात असतात . त्या हिशोबानुसार या पुलाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटींची तरतूद करण्यात आली होती . हे खासदार असलेल्या राऊत यांना कळत नसेल तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहीलेले 'अर्थसंकल्प – सोप्या भाषेत ' हे पुस्तक राऊत यांना भाजपातर्फे भेट देऊ अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

# नाशिकच्या राजकारणात भूकंप, सुधाकर बडगुजर आणि बबनराव घोलप यांचा भाजपात पक्षप्रवेश

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

नाशिकमधील ज्येष्ठ नेते सुधाकर बडगुजर, माजी मंत्री बबनराव घोलप, माजी महापौर नयना घोलप आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी आज भाजपात प्रवेश केला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत सुधाकर बडगुजर, बबनराव घोलप यांचा भाजपा प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला.

सुधाकर बडगुजर आणि बबनराव घोलप यांचा पक्षप्रवेशाचा दिवस हा अतिशय नाट्यमय राहिला. गेल्या दोन दिवसांपासून बडगुजर आणि घोलप यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरु होत्या. अखेर त्यांचा आज पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली. पक्षप्रवेशावेळी भाजपाच्या इतर नेत्यांना येण्यास उशिर झाला. मंत्रिमंडळ बैठकीमुळे हा उशिर झाल्याचे कारण सांगण्यात येत होते. पण याबाबत विविध चर्चा सुरु होत्या. अखेर पक्षप्रवेशाने या चर्चांना पूर्णविराम मिळाला.

ज्येष्ठ नेते सुधाकर बडगुजर यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीच्या दोन दिवसांनंतर शिवसेना ठाकरे पक्षाने सुधाकर बडगुजर यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करत हकालपट्टी केली होती. पक्षाकडून झालेल्या कारवाईमुळे सुधाकर बडगुजर नाराज झाले होते. त्यानंतर ते भाजपात प्रवेश करतील अशी राजकीय वर्तुळात चर्चा रंगली होती. मात्र नाशिकमधील भाजपा आमदार सीमा हिरे यांनी सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाला जोरदार विरोध केला. असे असले तरी आज (१७ जून) सुधाकर बडगुजर यांनी आपल्या हजारो कार्यकर्त्यांसोबत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन आणि रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. सुधाकर बडगुजर यांच्या



पक्ष प्रवेशासाठी मंत्री गिरीश महाजन यांनी मध्यस्थी केली.

सुधाकर बडगुजर यांनी भाजपात प्रवेश केला असला तरी त्यांच्या पक्षप्रवेशामुळे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नाराज असल्याची चर्चा सुरू झाली आहे. चंद्रशेखर बावनकुळे प्रदेश दौऱ्यावर असताना त्यांच्या कसिनोचा फोटो सुधाकर बडगुजर यांनी व्हायरल केला होता. यानंतर विरोधकांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार टीका केली होती.

अशातच सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबाबत मला माहिती नसल्याचे वक्तव्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सकाळी नागपूर येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधताना केले. त्यांनी म्हटले की, सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल कुठलीही माहिती माझ्याकडे नाही. जोपर्यंत स्थानिक टीम असते, पदाधिकारी, खासदार, आमदार त्यांच्याशी सल्लामसलत, एकमत झाल्याशिवाय आमच्याकडे पक्षप्रवेश होत नाही. आमच्याकडे बडगुजरांच्या पक्षप्रवेशाला स्थानिक पदाधिकाऱ्यांचा विरोध आहे. त्यामुळे सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल मला कुठलीही माहिती नाही, असे वक्तव्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले होते.

सुधाकर बडगुजर यांचा पक्षप्रवेश आज दुपारी २ वाजता होणार होता. मात्र चंद्रशेखर बावनकुळे आलेच नाहीत. गिरीश महाजन यांनी वारंवार फोन केल्यावर चंद्रशेखर बावनकुळे दुपारी ३.३० वाजता आले. मात्र तोपर्यंत सुधाकर बडगुजर यांना पक्षप्रवेशासाठी ताटकळत राहावे लागले.

भारतीय जनता पक्षात प्रवेश करताना सुधाकर बडगुजर म्हणाले, आज माझा भाजपात प्रवेश झाला. आदराने प्रवेश झाला, त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. गिरीश भाऊ संकटमोचक आहेत. आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला. आपल्यापर्यंत पक्षापर्यंत काय माहिती दिली हे माहिती नाही, मात्र मी निष्पाप आहे. कोव्हिडमध्ये मी चांगलं काम केलं, कोणी बाहेर येत नव्हतं. महापालिका निवडणुकीत दूध का दूध पाणी का पाणी होईल... ज्या पक्षाने कारवाई केली त्यांना सांगू इच्छितो. महाराष्ट्रात सांडपाण्यातून वीज निर्मिती प्रकल्प दिला. तो मुख्यमंत्र्यांनी दिला होता, ते दूरदृष्टीचे नेते आहेत. निष्ठेने काम करु आणि परिकाष्ठा करु, असंही बडगुजर यांनी सांगितलं.

यावेळी चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित राज्याचा संकल्प झालाय. आम्ही सर्व कोअर ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. बडगुजर आणि घोलप यांच्या पक्षप्रवेशाने पक्ष मजबूत होईल. अधिक ताकदीनं आम्हाला पुढे जाता येईल. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या संकल्पाला पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही करतोय. विकासासाठी भाजपात पक्षप्रवेश होत असतो. कुठलीही अपेक्षा न ठेवता त्यासाठी त्यांनी पक्षप्रवेश केला. सकाळी निघालो तेव्हा वाटलं २-३ दिवसांनी पक्षप्रवेश ठरेल. मात्र, आजच मंगळवार असल्याने त्यांनी आज ठरवलं.

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले, मनभेद नाहीत, मतभेद आहेत ते देखिल दूर होईल याचा विश्वास आहे. कोणी एखाद्या पक्षात असतो तेव्हा तो वाढवण्यासाठी पुढे जात असतो, कधी शिंतोडे उडवतो. मात्र, आता जबाबदारी आहे की जुन्या नव्यांना घेऊन पुढे जायचं आहे. ज्या पक्षाला आयुष्य देतो तिथे अपमान होत असेल आणि काळजी होत नसेल तर बरोबर नाही. नाशिकात येतील तेव्हा मेळावा घेऊयात, जे राहिले आहेत त्यांचा पक्षप्रवेश करूयात. भाजपा तुमची प्रतिष्ठा कधीही कमी होऊ देणार नाही. पक्षात कधी वाटणार नाही कधी की नवीन घरात गेलोय. जुन्या नव्या कार्यकर्त्यांना एकत्र करत सर्वांनी राहावं इतकीच विनंती करतो.

गिरीश महाजन म्हणाले, प्रवेश कधी होणार? अशा बातम्या बऱ्याच दिवसापासून चालल्या होत्या. आज तो दिवस आलेला आहे. मी सुधाकर बडगुजर यांचे अभिनंदन करतो. निवडणुका समोर आहेत, नाशिक बालेकिल्ला आहे. गेल्या वेळी ६८ नगरसेवक होते, आणि आता किती करायचे, १०० पार करायचे... आपण सर्व मिळून आता प्रयत्न करूयात. जास्तीत जास्ती पालिका, परिषदा हाती घ्यायच्या आहेत. आपण महायुतीत आहोत.

# धुळे जिल्ह्यात चोरीच्या 12 दुचाकी हस्तगत; दोन चोर ताब्यात

**श्री. संजय बच्छाव**
**धुळे जिल्हा प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

----------------------------

चोरीची दुचाकी विक्री करण्यापूर्वीच दोन चोरट्यांना पकडण्यात शिरपूर शहर पोलिसांना यश आले. चौकशीत त्यांनी १३ लाख ९० हजार रुपयांच्या चोरीच्या १२ दुचाकी पोलिसांना काढून दिल्या.

शिरपूर तालुक्यातील वाघाडी ते वाडी गावांदरम्यान कुवे फाटा येथे चोरीची दुचाकी विक्री करण्यासाठी दोन व्यक्ती येत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकाला कार्यवाहीच्या सूचना केल्या. पथकाने वाघाडी रस्त्यावर नाकाबंदी करुन अनिल पावरा (२२, रा.शिंगावे, ता.शिरपूर, हल्ली मुक्काम तेलखेडी,.धडगाव, नंदुरबार) आणि दीपक हिरालाल उर्फ विजय पावरा (२०, रा.मोयदा, शिरपूर, हल्ली मुक्काम विखरण ता.शिरपूर) यांना अडविले. त्यांना ताब्यात घेत पोलीस ठाण्यात आणले. चौकशीवेळी त्यांनी दुचाकी चोरीची कबुली दिली.

पोलिसांनी त्यांच्याकडून १३ लाख ९० हजार रुपयांच्या १२ दुचाकी या वाघाडी, कुवे, शिंगावे, अर्थे अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून हस्तगत केल्या. या दोघा चोरांनी या दुचाकी धुळे, नंदुरबार, जळगाव, बडवानी येथून चोरल्याची कबुली दिली. चोरलेल्या १२ दुचाकींमुळे १० गुन्ह्यांची उकल झाली. शिरपूर




शहर पाच, शिरपूर तालुका एक, शहादा दोन, पानसेमल (जि.बडवानी) एक, बाजारपेठ (जि.जळगाव) या पोलीस ठाण्यांचा हद्दीतून या दुचाकी चोरी केल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. याप्रकरणी हवालदार रवींद्र आखडमल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरोधात शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपअधीक्षक सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी आणि शोध पथकातील हवालदार राजेंद्र रोकडे, रवींद्र आखडमल, सोमा ठाकरे, आरीफ तडवी, सचिन वाघ, विनोद आखडमल, गोविंद कोळी, योगेश दाभाडे, भटू साळुंके, प्रशांत पवार, मनोज महाजन, मनोज दाभाडे, विलास कोळी, जितेंद्र अहिरराव यांनी ही कामगिरी केली.

सम्पादकीय

# पूल दुर्घटनेची पुनरावृत्ती नको...

अहमदाबाद येथील भीषण विमान अपघाताच्या स्मृती द्याप ताज्या असतानाच महाराष्ट्र आणि उत्तराखंड या राज्यांत दोन अपघात घडले. दोन्हींचे एकच कारण आहे ते म्हणजे, पर्यटकांचा अति उत्साह आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन न करता आपले वाहन संकटात टाकणे अन् मृत्यूला कवटाळणे. मावळमधील अपघात हा अशा प्रकारच्या पहिलाच अपघात नव्हे, तर त्या अगोदरही अशा प्रकारचे अपघात घडले आहेत. मावळमधील इंद्रायणी नदीच्या पुलावर कुंडमळा येथे अपघात घडला तो पूल खूप अरुंद आहे. तेथे वाहने घेऊन जाऊ नका, म्हणून वारंवार प्रशासनाकडून सूचना देण्यात येतात. पण पर्यटक ऐकत नाहीत आणि रविवारी दुपारी अपघात घडला तेव्हा त्या अरुंद पुलावर अनेक पर्यटक होते हे समजले आहे. हे पर्यटक पाणी पाहण्यासाठी जातात आणि वाहत्या पाण्यात कित्येक पर्यटक जीव गमावून बसले. कित्येक जण वाहून गेले, तर कित्येक बेपत्ता आहेत. आता त्यांची चौकशी होईल आणि नेमकी किती प्राणहानी झाली आहे तो आकडा समोर येईल. पण प्राथमिक आकडेवारीनुसार दहा ते पंधरा पर्यटक वाहून गेले असल्याची माहिती आहे. राज्य सरकारने सर्व पुलांचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने सर्व पुलांची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. आता वारी पुढे आहे आणि लाखो वारकरी येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या पाहिजेत. पण त्या अगोदरच या दुर्घटनेने प्रशासनाच्या डोळ्यांत चांगले अंजन घातले आहे. मावळ तालुक्यातील पर्यटकांचे आकर्षण म्हणून ओळख असलेला तळेगाव-दाभाडे येथील कुंडमळा हे ठिकाण प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. पण काल दुपारी निसर्ग शोभेची मौज पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. पूल पडल्यामुळे पर्यटक नदीच्या पाण्यात वाहून गेले आहेत. सुमारे सहा मृतदेह हाती लागले आहेत. म्हणजे घटना किती गंभीर आहे हे लक्षात येईल. हा पूल जीर्ण झाला असून मागील वर्षभरापूर्वी या पुलाच्या दुरुस्तीसाठी सहा कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता. पण त्याचे काम सुरू झाले नाही. या दिरंगाईला जबाबदार असणारेच या अपघाताला कारण आहेत हा निष्कर्ष काढता येतो. अपघात घडला तेव्हा १०० जण पुलावर उभे होते असेही समजले आहे. पण त्यांना कोणीही अटकाव केला नाही. रविवारी या अपघाताच्या जीवघेण्या कळा उठायच्या आधीच उत्तराखंडमध्ये आणखी एक भीषण अपघात घडला होता आणि त्यात सातही प्रवासी मृत्युमुखी पडले. आर्यन अव्हिएशनचे हेलिकॉप्टर ५.१७ वा. अवकाशात उड्डाण करण्यासाठी झेपावले आणि हवामानाच्या खराब अवस्थेमुळे आणि कमी दृष्यमानता असल्यामुळे कोसळले. सदरचा अपघात हा गुप्तकाशी येथे झाला आणि हेलिकॉप्टर केदारनाथ येथे चालले होते. हेलिकॉप्टर अवकाशात उडाले तेव्हा हवामान अजिबात चांगले नव्हते आणि तरीही वैमानिकाने तसेच हेलिकॉप्टर पुढे नेले. कमी दृष्यमानता आणि खराब हवामान ही कारणे देण्यात आली आहेत. कमी दृष्यमानतेमुळे अपघातांचा धोका वाढतो आणि त्यामुळे भारतीय हवाई दलाचे एमआय १७ चॉपर वारा आणि वजनामुळे आपले तोल गमावून बसले आणि कोसळले अशी प्राथमिक कारणे सांगतात.

मावळमधील दुर्घटना असो किंवा हेलिकॉप्टर अपघात, प्रथम समोर येते ती प्रवासाची आवड... परिणामी कसलाही सारासार विचार न करता लोक प्रवासाला निघतात. ते हवामान कसे आहे आणि पाऊस असल्यामुळे हेलिकॉप्टर किंवा विमानाची दृष्यमानता आहे की नाही, हेही तपासण्याचे कष्ट घेत नाहीत. उत्तराखंड तर लांब आहे. पण इंद्रायणी नदीवरील पूल हा आपल्या महाराष्ट्रातील आहे आणि तेथे लोक आता पावसाळ्यात भरपूर प्रवास करतील आणि अशा अनेक अपघातांना सामोरे जातील. भुशी डॅम असो, लोणावळा किंवा अलिबागचा समुद्रकिनारा असो किंवा रत्नागिरीतील प्रसिद्ध पर्यटन स्थळे असोत, येथे अद्याप तितक्या सुविधा तयार झाल्या नाहीत. त्यामुळे प्रशासनाच्या हलक्या चुकीमुळेही प्रवाशांचा जीव जाऊ शकतो. तेच उत्तराखंडबद्दल सांगता येईल. तेथे खराब हवामान हा नेहमीचा इश्यू आहे. पण अशा हवामानात जाऊ नका असे सांगणारी कोणतीही यंत्रणा नाही. आता तेथे वैष्णोदेवीची यात्रा भरेल, तेव्हाही कित्येक लोकांचा जीव संकटात असेल. कारण तेथे तर रस्ते इतके अरुंद आहेत की फक्त खेचर चालत जाऊ शकते. लोकांच्या भक्तिभावाशी यात्रा जोडल्या गेल्याने त्यांना पुरेशा सुरक्षा पुरवणे आणि अपघात होऊ नयेत ही प्रशासनाची जबाबदारी आहे. केदारनाथवरून कित्येक हेलिकॉप्टर्सना अपघात घडले आहेत.

भारतात अशा अपघातात किती लोक बळी गेले याची आकडेवारी पाहिली तर ती दहशतवाद्यांच्या हल्ल्यापेक्षा जास्त बळी गेले आहेत असे दिसते. त्यामुळे रस्ते अपघात किंवा पूल दुर्घटना किंवा हेलिकॉप्टर अपघात यामुळे झालेली प्राणहानी कोणत्याही कारणापेक्षा भीषण आहे. केवळ तात्पुरती नुकसानभरपाई देऊन हा प्रश्न सुटणार नाही. त्याची कारणे शोधून काढून चौकशी व्हावी आणि ज्या काही बॉटलनेक्स असतील त्या तातडीने काढून टाकल्या तरच असे अपघात घडणार नाहीत. मावळ असो किंवा उत्तराखंड असो, अपघात असो, जातात ते मानवी जीव जे प्रचंड किमती आहेत. त्यासाठी प्रशासनाने भविष्यात असे अपघात होऊ नयेत म्हणून तातडीने उपाययोजना हाती घेतली पाहिजे कारण हे जीव परत येणार नाहीत. यामुळे भारताचे नुकसान होते कारण कुणी कितीही लहान असला तरीही त्याच्या विकासासाठी देशाने आपली किमत मोजलेली असते. असे जीव जाणे म्हणजे देशाचे प्रचंड नुकसान आहे. हे होऊ नये यासाठी भविष्यात प्रत्येकानेच दक्ष राहिले पाहिजे.

# विचारपुष्प

## आपली नाती आपली माणसं

आयुष्यात कितीही सुदाम्यासारखे जीवन वाट्यास आले तरी चालेल, श्रीकृष्णासारखा निस्सिम मित्र पाठी असावा. आपल्या कर्मात राखीचा धागा बांधणारी बहिण नाही म्हणून कुढत रडत बसण्यापेक्षा मैत्रीच्या नात्यात एखादी धर्माची बहिण शोधावी ! पांडवासारखे बंधूप्रेम नसेल मिळत, परी कौरवांचे विचार मनी आनू नये. जन्मदाता विठूराया जर बाप असेल, तर रखूमाई आई असते. ज्या दिवशी आपले मायबाप वैकुंठी जातात त्या दिवसा पासून आपल्या आयुष्याची संसारपंढरी सुनी होऊन जाते. आपन ज्ञानी नसलो म्हणून काय झाले ? एखाद्या मुक्ताई सारख्या बहिणीच्या कुशीत शिरून मनसोक्त रडून अश्रूंना वाट करून द्यावी. म्हणजे वर्तमान आयुष्याच्या संसारात दुःख येणार नाही. आले तरी संकटावरती मात करायला आपले पवित्र विचार व सतकर्म कामी येते. आणि मग आयुष्यात भविष्याची संध्याकाळ सुखाची होऊन जाते.......

----------------------------

लेखक
गावगाडाकार
साहेबराव नंदन तात्या
नाशिक

# जल, स्थल, वायू यावर मानवी अतिरेक वाढल्याने अनेक धोके निर्माण होऊन दुर्घटना होत आहे.

दिवसेंदिवस ज्याप्रमाणे अत्याधुनिक सुविधा निर्माण होत आहे त्याच्या दुप्पट विणाशाचे दरवाजे उघडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.ही स्थिती फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगभर दिसुन येते.महत्वाचे म्हणजे जगभरातील अनेक देशात २०२५ मध्ये भयावह युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते व अनेक भयावह दुर्घटना पहायला मिळत आहे आणि दुर्घटनांची साखळी सुरूच आहे.म्हणजे आजच्या परिस्थितीत पृथ्वीवरील मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू अत्यंत कठीण परिस्थितीत जगत असल्याचे दिसून येते. आपण म्हणतो की आकाशातील प्रवास (विमानप्रवास) सर्वात सुरक्षित असल्याचे जगजाहीर आहे.परंतु आज विमानतळ दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. दिनांक १२ जूनला गुजरात मधील अहमदाबाद विमान दुर्घटना अंत्यंत भयावह होती. विमानाने उडान घेताच ३० सेकंदात एका मेडिकल होस्टेलवर कोसळले यात विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला व होस्टेलमधील अनेक विद्यार्थींचा मृत्यू झाला व अनेक गंभीररीत्या जखमी झाले.त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की विमानाने प्रवास चांगला की वाईट. आपण हेलिकॉप्टर सुरक्षित समजतो परंतु हेलिकॉप्टरच्या दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा वाढले आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे दिनांक १२ तारखेला केदारनाथ दर्शनासाठी गेले असता दर्शनानंतर ते आर्यन एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने गुप्तकाशीकडे निघाले असताना अचानक हवामान बदलले दाट धुके व अवकाळी पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हेलिकॉप्टर जंगलात कोसळले यात एकूण ७ प्रवास्यांचा मृत्यू झाला.म्हणजे सध्याच्या परिस्थितीत निसर्ग सुध्दा मानवाच्या अतीरेकाला त्रासल्याचे दिसून येते व त्यामुळे दु:खद घटना घडतांना दिसतात.अशा परिस्थितीत प्रश्न उपस्थित होतो की आपल्यासाठी काय सुरक्षित आणि काय सुरक्षित नाही? मावळ तालुक्यातील प्रसिद्ध कुंडमळा येथे १५ जून रोजी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.येथील इंद्रायणी नदीवरील असलेल्या ३२ वर्षे जुन्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांच्या गर्दीमुळे पुलाचा मधला भाग अचानक कोसळला.सुमारे ३५-४० जण पुलावरून कोसळल्याने जखमी झाले असून चौघांचा मृत्यू झाला ६ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे आणि नदीचा प्रवाह जास्त असल्याने अनेक जण वाहून सुध्दा गेल्याचे सांगितले जाते.अशाप्रकारे निसर्ग सर्वांचीच गोच्ची करतांना दिसते. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील शांतमय ठिकाणी पर्यटक आनंद लुटण्यासाठी गेले असता अचानक आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला यात २८ जणांचा निर्घृणपणे हत्या करण्यात आली.म्हणजे आजच्या परिस्थितीत एकांतवास सुध्दा कठीण झाला आहे.याचप्रमाणे दिवसेंदिवस रेल्वेचे सुध्दा अपघात वाढल्याचे दिसून येते.नुकताच मुंबई येथे लोकल ट्रेनचा अपघात झाला यात अनेकांचा बळी गेला.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत मानवजातीसाठी कोणतेही ठीकाण सुरक्षित नसल्याचे दिसून येते.आतातर नौकरीवर जातांना, बाहेर जातांना, पायदळ फिरतांना सुध्दा आपण सुरक्षित आहोत की नाही याचीही शंका निर्माण झाली असून चिंता वाटायला लागली आहे.याहीपलीकडे आपण विचार केला तर देवदर्शन किंवा फिरणेही महागात पडतांना दिसत आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की "जाये तो जाये कहा!"आतातर इजरायल -इरान युद्ध आरपारचे समजल्या जात आहे यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.कारण युक्रेन-रशिया संघर्ष सुरूच आहे सोबतच अनेक देशात गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते.सध्याचे युध्द साधे रहाले नसुन बॉम्ब वर्षाव, ड्रोन हल्ला, मिसाईल अशाप्रकारे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वापरल्या जात आहे.सध्याच्या परिस्थिती युक्रेन, रशिया, ईरान,इजरायल यांच्या युध्दामुळे सर्वत्र आगीचे सावट दिसून येते.यामुळे लाखोंच्या संख्येने जिवित हाणी होत आहेच सोबतच वित्तीय हानी सुध्दा मोठ्या प्रमाणात होत आहे.म्हणजेच मानवजातीसाठी सध्याचा काळ अत्यंत बिकट, गंभीर व धोकादायक स्थितीत येवून ठेपला आहे. आज पृथ्वीवर होत असलेल्या मानवी अतिक्रमणामुळे हिमकडा कोसळने,ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, भूकंप ढगफुटी, अती पाऊस, अती उष्णता, अती थंडी आणि आता युध्दजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला आगडोंब यामुळे सर्वत्र विणाशलिला दिसून येत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जितक्या सुखसुविधा निर्माण केल्या आहेत त्याचे दुष्परिणाम हळूहळू वाढत असून विनाशाकडे वाटचाल करीत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येईल की स्थल, वायू, जल, आकाश-पाताळ हे संपूर्ण ठिकाण आज मानवामुळे विणाशाचे कारण बनत आहे व यांमुळेच भयावह दुर्घटना होतांना दिसतात.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत या विद्यालयामध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

## मुख्याध्यापक आणि शिक्षक यांनी गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे केले स्वागत

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

अंबिका मित्र मंडळ संचलित, माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत, दौलतनगर. विद्यालयात दि.१६/०६/२०२५ वार- सोमवार रोजी नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२५–२६ विद्यार्थी प्रवेश उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला संस्थेचे सचिव मा.संदीप पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थींना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्या दिलेल्या व आनम शिक्षण प्रसार मंडळ संस्थेचे सचिव श्री.अशोक पाटील यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले तसेच विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तक संच देऊन त्यांच्या मनोगतातून विद्यार्थींना नवीन







शैक्षणिक वर्षात विद्यार्थींना शासनाकडून पाठ्यपुस्तका बरोबर शालेय गणवेश शासनाने खाजगी अनुदानित शाळेतील गोरगरीब विद्यार्थींना मिळाला पाहिजे त्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना लेखी निवेदन देणार आहोत असे आश्वासन दिले,व विद्यार्थींना नवीन शैक्षणिक वर्ष सन - २०२५-२०२६ कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. बाळासाहेब पाटील, शाळेचे मुख्याध्याप श्री. सतिश सोपान भालेराव, जेष्ठ शिक्षिका श्रीमती.निता पाटील, श्री.जगताप के.डी, श्री.भटू पाटील, श्रीमती.खैरनार व्ही.ए ,श्री.तुपे टी.आर, श्री.सोनवणे एस.पी, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राठोड व्ही.बी यांनी केले. कार्यक्रमास श्री.अंभोरे आर.ए, श्री.रवी पाटील,यांनी मोलाचे सहकार्य केले.



# निसर्ग मित्र समिती पुणे व हस्ती बँक दोंडाईचा तर्फे पुणे येथे पर्यावरण परिषदेचे आयोजन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------

महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त-निसर्ग मित्र समिती व हस्ती बँक दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पर्यावरण परिषद व सन्मान सोहळा संपन्न होणार आहे, यावेळी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, पर्यावरण , उद्योग, वैद्यकीय, शासकीय- अधिकारी - पदाधिकारी. ग्रामपंचायत, शैक्षणिक संस्था या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सन्माननीय मान्यवरांना महाराष्ट्र भूषण सन्मान २०२५ने सन्मानीत करण्यात येणार आहे, तसेच राज्यातील ४ सन्माननीय व आदरणीय व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती निसर्ग मित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रेमकुमार अहिरे, राज्य अध्यक्ष वृक्षमित्र बापूसाहेब डी आर पाटील राज्य महासचिव आबासाहेब संतोषराव पाटील ,राज्य उपाध्यक्ष तथा संयोजन समितीचे अध्यक्ष आबासाहेब आर डी पाटील, हस्ती बँकेचे चेअरमन वृक्षमित्र कैलास भाऊ जैन, संयोजन समिती चे कार्याध्यक्ष डी बी पाटील, उपाधयक्ष विलासराव देसले, धुळे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र भदाणे, जिल्हा महासचिव विश्वास पगार, श्री दिनेश बोरसे साक्री, पुणे जिल्हाध्यक्ष दिपक भैय्या पाटील, पुणे जिल्हा सचिव ईसा भाई शेख, आदी संयोजन समिती चे पदाधिकारी यांनी कळविले आहे,

# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना; १९ व २० रोजी येलो अलर्ट जारी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी १६ जून २०२५ रोजी दुपारी १३:०० वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १९ व २० जून २०२५ हया दोन दिवसांसाठी यलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. दि. १९ व २० जून २०२५ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा**

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोन मध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाउनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲप मुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

**या गोष्टी करु नका**

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# "आधी रोटी खायेंगे, स्कूल जरूर जायेंगे"! असा संदेश देत नूतन मराठा विद्यालयात छडवेल कोरडे विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------





दिनांक १६ जून २०२५ रोजी नूतन मराठा विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे शाळा प्रवेशोत्सव उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे नियोजित अध्यक्ष संस्थेचे विश्वस्त मा.अण्णासाहेब यु.एल.बोरसे, छडवेल गावच्या उपसरपंच मा.सौ.मीनाबाई साहेबराव बेडसे, गावातील प्रतिष्ठित व्यापारी मा.शेखर भदाणे, सेंट्रल बँक शाखा व्यवस्थापक मा.कोल्हे साहेब, प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक मा.रघुनाथ नागरे, शिक्षक प्रतिनिधी श्री एच डी पवार, शिक्षकेतर प्रतिनिधी श्री सिद्धार्थ मोहिते, श्री एन के बेडसे,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू आणि भगिनी व इयत्ता १०वी वर्गातील विद्यार्थिनी यांच्या हस्ते विद्यालयात इयत्ता पाचवीतील आलेल्या सर्व नवोगत प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत एक वही व पाठ्यपुस्तकांचा संच देऊन करण्यात आले. विद्यालयाचे संगीत शिक्षक आर एस खैरनार यांनी स्वागत गीत सादर केलं. विद्यालयाचे प्राचार्य माननीय रावसाहेब संजय कुमार पाटील यांनी आपल्या मनोगतातून आज पहिल्या दिवशी उपस्थित झालेल्या विद्यार्थ्यांना आधी रोटी खायेंगे, स्कूल जरूर जायेंगे ! असा मौल्यवान संदेश दिला. अण्णासाहेब यु.एल.बोरसे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री ए.के.पाडवी सर यांनी केले.

# पांगोली नदीवरील 'मृत्यूचा सापळा'

## इंद्रायणी दुर्घटनेनंतरही प्रशासन गाढ झोपेत!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------





घोटी-म्हसगाव मार्गावरील पांगोली नदीवरील जुना पूल सध्या मृत्यूच्या उंबरठ्यावर उभा आहे – आणि तो कोसळण्याची केवळ वेळ बाकी आहे! पुलाची अवस्था इतकी धोकादायक झाली आहे की, त्यावरून दररोज जाणाऱ्या वाहनधारकांचे प्राण अक्षरशः धोक्यात आहेत. पण, आश्चर्य म्हणजे, प्रशासन अजूनही शांत आहे – ना कोणती दुरुस्ती, ना नवीन पुलाचे ठोस काम.

१५ जूनला पुण्यात इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून पर्यटकांचा मृत्यू झाला, अनेक जण गंभीर जखमी झाले – पण तरीही गोंदियातील यंत्रणांच्या डोळ्यांत झोप गेलेलीच दिसते. इंद्रायणी दुर्घटनेनं देश हादरला, पण पांगोलीवरील 'मृत्यूचा पूल' अजूनही फक्त चर्चा आणि आश्वासनांपुरता!

या पुलासंदर्भात स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी आंदोलने, निवेदने, मागण्या केल्या. जनप्रतिनिधींना, जिल्हा परिषद सदस्यांना, पंचायत समितीच्या लोकांना वारंवार सांगण्यात आलं. पण या सगळ्यांची 'वर्चस्व गमावलेली' स्थिती पाहता त्यांच्याकडून काही अपेक्षा ठेवणं म्हणजे दिवास्वप्नच!

सत्ताधारी महायुती असो किंवा विरोधक – दोघांनीही केवळ 'निवडणुकीच्या तोंडावर' या पुलाचा मुद्दा उचलायचा आणि मग शांत बसायचं हे ठरवून टाकलंय. "लवकरच पूल उभारला जाईल," असं म्हणत अनेक नेते गेले... पण अजूनही पुल तसाच आहे – जर्जर, धोकादायक आणि प्राणघातक!

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नवीन पुलासाठी प्रस्ताव सादर झाला आहे, पण तो सध्या शासनाच्या फाईलमध्ये धूळ खात पडून आहे. प्रशासनाचे हे दुर्लक्ष म्हणजे थेट नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे.

पांगोली नदीचा उगम गोरेगाव तालुक्यातील तेढा गावात असून ही नदी तीन तालुक्यांतून वाहत जाते. त्यावर बांधले गेलेले हे पुल सध्या वाहनांच्या ओझ्याखाली अक्षरशः चिरडले जात आहेत. यात एखादी मोठी दुर्घटना घडली, तर जबाबदार कोण? हा पूल नव्हे तर मृत्यूचा सापळा बनलाय. किती प्राण जावे लागतील प्रशासनाला जाग यायला?

# गोंदियाच्या CAREER XONE चे ४८ विद्यार्थी होणार डॉक्टर!

## NEET परीक्षेत मिळवले अभूतपूर्व यश

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------




गोंदिया जिल्ह्यातील CAREER XONE ने यंदा N E E T परीक्षेत इतिहास घडवला आहे. संस्थेचे तब्बल ४८ विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरले असून हे सर्व विद्यार्थी लवकरच 'डॉक्टर' होण्याच्या मार्गावर आहेत. या गौरवाच्या क्षणाचा उत्सव साजरा करण्यासाठी CAREER XONE च्या वतीने भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यंदाच्या N E E T परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून CAREER XONE च्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये तिरोडा तालुक्यातील निशांत बोपचे याने ऑल इंडिया रँक ३७६०, तर हर्षिता खलारी हिने ST प्रवर्गातून ऑल इंडिया रँक ८२, आणि सानिका रत्नाकर हिने रँक ४०५२ मिळवत गोंदियाचे नाव उज्ज्वल केले आहे.

CAREER XONE चे संचालक रोहित झा सर यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेले हे यश विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि संस्थेच्या दर्जेदार शिक्षणपद्धतीचे फलित आहे.

# मल्हारवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सौ. अश्विनी खैरणार यांची बिनविरोध निवड

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------





नांदगाव तालुक्यातील मल्हारवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ. अश्विनी मुकुंदा खैरनार यांची बिनविरोध निवड झाली..आवर्तन पद्धतीने ठरल्यानुसार चित्रा मधुकर इघे यांनी आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या सरपंचपदासाठी मंगळवारी ( दि.१७ ) रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत सदस्य यांची विशेष सभा बोलविण्यात आली होती. या सभेत सरपंचपदासाठी अश्विनी खैरनार यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग सुकर झाला..निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडळ अधिकारी सुवर्णा गोडे व सहाय्यक निवडणुक अधिकारी तलाठी सचिन मोरे यांनी अश्विनी खैरनार यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. त्यांना ग्रामपंचायत अधिकारी आर. एम मगर, कर्मचारी कृष्णा बावणे यांचें सहाय्य लाभले..या विशेष सभेस उपसरपंच दिपक खैरनार, ग्रामपंचायत सदस्या सारिका जेजुरकर, चित्रा इघे, मीना गोविंद, सरला काकळीज, शोभा पिठे, सुनंदा झेंडे, ग्रामपंचायत सदस्य राहुल पवार आदी उपस्थित होते. या निवडीनंतर ढोल ताशांचा गजर व फटाक्यांच्या आतिषबाजीत जल्लोष साजरा करण्यात आला. नवनिर्वाचीत सरपंच अश्विनी खैरणार यांचे तालुक्याचे आ . सुहास कांदे यांच्या वतीने युवा नेते सागर हिरे ' बाजार समिती संचालक अमोल नावंदर तसेच बाजार समितीचे माजी सभापती सतीष बोरसे ' अर्जुन ( बंडू ) पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले यावेळी जि. प माजी सदस्य रमेश बोरसे ' शिवाजीराव पाटील ' संजय सानप ' संतोष गुप्ता ' डॉ. वाय. पी. जाधव ' बाजार समितीचे सचीव अमोल खैरणार ' नानू कवडे यांनी अभिनंदन केले यावेळी दिपक कासलीवाल ' गोकुळ खैरणार ' बाळासाहेब गोराडे ' संदीप खैरणार ' ओमप्रकाश अग्रवाल ' शामसुंदर धूत ' अशोक पाटील ' भय्या संगवे ' आनंदशेट चोरडीया ' समाधान भोसले ' सुनील भवर ' समता परिषदेच्या सौ. चंदकला बोरसे यांचेसह मल्हारवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोपखेल आश्रमशाळेत ' प्रवेशोत्सव ' उत्साहात साजरा

## पद्मश्री श्री. चैत्राम पवार यांनी केले नवगतांचे स्वागत

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------





बोपखेल दिनांक १६ जून सोमवार रोजी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, व बोपखेल, तालुका साक्री जिल्हा धुळे येथे सक्षणिक वर्ष २०२४ २५ च्या `प्रवेशोत्सवा 'चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य नाशिक यांच्या आदेशान्वये आयोजित या सोहळ्यात विद्यार्थी, पालक आणि परिसरातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री पुरस्काराने सन्मानित वन भूषण श्री चैत्राम पवार उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष शोभा आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,धुळे यांच्यातर्फे प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आलेले सहाय्यक आदिवासी विकास निरीक्षक श्री डी आर पाटीलयांनीभूषविले.

मंचावर शाळेचे प्राचार्य किरण मनोरे आणि आधिक्षक श्री रमेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थित होते. या व्यतिरिक्त कार्यक्रमाला रावसाहेब अहिराव, दानियल वळवी, जीतु कुवर, पत्रकार भिलाजी जिरे, बारीपाड्याचे सरपंच अनिल पवार, बोपखेल गावातील व आजूबाजूच्या परिसरातील प्रतिष्ठित नागरिक सामाजिक कार्यकर्ते, माजी सरपंच,शाळेतील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी, आधिक्षक आणि आधिक्षीका मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेशोत्सव कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणून शाळेत, नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन warmly स्वागत करण्यात आले. या स्नेहपूर्ण स्वागतामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाबद्दल अधिक उत्सुकता निर्माण झाली. तसेच,शैक्षणिक वर्ष २०२३ २४ मध्ये इयत्ता दहावी आणि बारावी मध्ये उज्वल यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाचे कौतुक करून इतरांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मश्री श्री. चैत्राम पवार यांनी आपल्या ओघवत्या भाषणात विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाचे आणि ध्येयनिष्ठेचे महत्त्व पटवून देत, उज्वल भविष्यासाठी शिक्षणाची कास धरण्याचे आवाहन केले. तसेच पालकांनाही आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री डी आर पाटील यांनी शासनाच्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध योजना आणि कार्यक्रमाची सविस्तर माहिती उपस्थिताना दिली. ज्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना या योजनाचा लाभ घेण्यास मदत होईल. शाळेचे मुख्याध्यापक श्री किरण मनोरे यांनी बोपखेल आश्रम शाळेच्या शैक्षणिक वाटचालीबद्दल आणि भविष्यातील योजनांबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नितीन गांगुर्डे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. तर, कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री ज्ञानेश्वर शिंदे यांनी केले. श्री महेंद्र पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

यावेळी, शालेय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत, या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात हिरवळ वाढवण्यास मदत होईल. अशा प्रकारे, शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा बोपखेल येथे 'प्रवेशोत्सव ' कार्यक्रम मोठ्या चैतन्यमय आणि उत्साहवर्धक वातावरणात यशस्वीपणे पार पडला, ज्यामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची दमदार सुरुवात झाली.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

PASSWORD PROTECTED PAGE